पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ७९७ दिनांक - ०८/११/२०२३**

येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर

## वाहनचोरी करणारा गुन्हेगार येरवडा तपास पथकाकडून जेरबंद

येरवडा परिसरात सादलबाबा बसस्टॉप येथे मोटारसायकल चोरी करणारा इसम थांबलेला आहे अशी बातमी तपास पथकाचे पोलीस अंमलदार,अमजद शेख व अनिल शिंदे यांना मिळाल्याने सदरची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन यांना कळविल्याने त्यांनी मिळालेली माहिती वरुन कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले त्याप्रमाणे तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक,अंकुश डोंबाळे व पोलीस अंमलदार यांनी तेथे जावून संशयीत इसमास पळून जात असताना अतिशय शिताफीने पकडले.

त्यास नाव पत्ता विचारता **रोहित पाडुरंग शिंदे,वय-४२ वर्षे,रा.रेंजहिल्स,खडकी,पुणे** असे असल्याचे सांगितले. सदर इसमाचे ताब्यात एक होंडा ॲक्टीव्हा मोटारसायकल मिळून आल्याने त्याबाबत अधिक चौकशी करता सदर गाडी त्याने सादलबाबा चौक येरवडा येथून चोरी केल्याचे कबूल केले आहे. येरवडा पोलीस स्टेशनला सदरबाबत पडताळणी केली असता **येरवडा पो स्टे गुरनं.७४६/२०२३,भादवि कलम ३७९ अन्वये** गुन्हा दाखल असल्याने,सदर गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने रोहित शिंदे यास दि. ०४/११/२०२३ रोजी अटक केली आहे.सदर आरोपीकडे अधिक तपास करता त्याने येरवडा भागात आणखी एक मोटारसायकल चोरी केल्याचे कबूल केले आहे. सदरबाबत येरवडा पो. स्टे. येथे पडताळणी केली असता १)येरवडा पो.स्टे. गु.र.नं.७४६/२०२३ भादवि ३७९ २)येरवडा पो.स्टे. गु.र.नं. ४४९/२०२२ भादवि ३७९ असे एकूण २ गुन्हयातील मिळून दोन मोटारसायकल एकूण ८५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन एकूण २ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-४,श्री.शशिकांत बोराटे, मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,श्री.संजय पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.बाळकृष्ण कदम, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्रीमती.कांचन जाधव, पोलीस निरीक्षक,श्री.जयदिप गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोउपनि.अंकुश डोंबाळे, श्रेणी.पोउपनि.प्रदिप सुर्वे, पोलीस अंमलदार,गणपत थिकोळे, दत्ता शिंदे, तुषार खराडे, किरण घुटे, अमजद शेख, कैलास डुकरे, प्रविण खाटमोडे, सागर जगदाळे, अनिल शिंदे, राहुल परदेशी, सुरज ओंबासे, दत्तात्रय शिंदे, प्रशांत कांबळे, सुशांत भोसले यांनी केलेली आहे.

